| MHAU030040722026 | फौ.कि.अर्ज क्र.७५८/२०२६<br><br>प्रदिप वि. सरकार |
|---|---|

# निशाणी क्रमांक १ वरील आदेश

सदरचा अर्ज ही अर्जदार प्रदिप राजाराम सुरवसे यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे जप्त मुद्देमाल बंधपत्रावर परत मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, अर्जदार हा औरंगाबाद येथे दिव्य मराठी मध्ये पत्रकार म्हणून काम करुन कुटूंबाची पालन पोषण करतात. अर्जदार हे वेगवेगळया जागी पैशांची गूंतवणूक नेहमीच करीत असतात. त्याचप्रमाणे अर्जदार यांचे मोबाईलवर टेलिग्राम खाते चालू करण्यासाठी एक संदेश आला व त्यावर पैसे गूंतवणूक केल्यावर पैसे वाढून मिळतील अश्याप्रकारे फोन देखील अर्जदार याला आला. त्यानंतर अर्जदाराने तिचे खाते चालू करुन पैशांची गूंतवणूक केली. दिनांक ०३/१०/२०२५ रोजी त्यांच्या मोबाईल नं ७५०७७७२१३ वर टेलिग्राम आले व सदरील टेलिग्राम वर एक लिंक दिलेली असून त्या लिंक वर जाताच टास्क दिला जाईल व जसे जसे टास्क सोडवत तसे तसे रक्कम वाढून मिळेल त्यावेळी अर्जदार हिने सदरील लिंक वर बटन दाबताच तिला काही रक्कम त्यामध्ये गूंतवण्यास सांगितले व त्याचा मोबदला भरलेल्या रक्कमेपेक्षा जास्त मिळेल म्हंटल्यावर अर्जदार याने काही रक्कम गूंतविली व त्याला त्याचा मोबदला मिळाला नाही.

३. अर्जदार पुढे असे कथन करते की, गून्हा क्र. ३१९०१२६०००४८५२ व गून्हा क्रं ३१९०१२६००१०२९१ असे दोन वेगवेगळ्या गून्ह्यानूसार दिनांक ०३/१०/२०२५ ते ०५/१२/२०२५ रोजी अर्जदार याने सदरील टेलिग्रामच्या लिंक वर जाउन ऑनलाईन स्वरुपात एकुण रक्कम रुपये १९,१६,५००/– गूंतवले. तसेच, अर्जदार यांची सदरील रक्कम १९,१६,५०००/– एवढी रक्कम त्यांचे दोन विविध खाते असलेले आयडीएफसी फस्र्ट बॅंक शाखा,

गजानन मंदीर, गारखेडा परिसर, औरंगाबाद येथून खाते क्र. १०२५५३७८००१ तसेच दूसरे खाते असलेले रत्नाकर बँक लिमिटेड शाखा सिडको, जालना रोड, औरंगाबाद येथील खाते क्र. ३०९००००२८८४८ यावरुन गेलेली आहे. सदरील रक्कम मधून अर्जदार यांना कोणताही मोबदला झाला नसल्याने, अर्जदार यांना फसवणूक झालेली असल्याचे लक्षात आले म्हणून त्याने दिनांक १०/०१/२०२६ व १३/०१/२०२६ रोजी सायबर क्राईमच्या ऑनलाईलन पोर्टलवर गुंतवणूक केलेली रक्कम १९,१६,५००/–बाबत गून्हा नोंदविला ज्याचा गून्हा क्र. ३१९०१२६०००४८५२ व गून्हा क्रं ३१९०१२६००१०२९१ असा आहे. तसेच सदर गुन्ह्यांमध्ये सायबर शाखेने रक्कम रुपये ८७,४६२.७७/– गोठवली आहे.

**४.** अर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदाराने सदरची रक्कम बँकेत पडून आहे तसेच अर्जदाराच्या उदनिर्वाह करीता सदरील रक्कमेची अत्यंत आवश्यकता आहे. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या पृष्ठयार्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडलेले आहे. अर्जदाराने ऑनलाईन तक्रारीच्या प्रती, अर्जदार यांचे आधार कार्ड, अर्जदाराच्या दोन्ही बँकचे स्टेटमेंट इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेल आहे. सदर कागदपत्रे असे दर्शवितात की, सदर रक्कम अर्जदाराच्या खात्यातुन कपात झालेली आहे.

**५.** तपासी अंमलदार यांचे म्हणणे असे की, अर्जदार प्रदिप राजाराम सुरवसे यांनी क्रि. एम.ए.नं. ७५८/२०२६ अन्वये दाखल केले आहे. प्रस्तुत प्रकरणात संबंधाने अर्जदार यांनी NCCRP नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल वर तक्रार दाखल केलेली असुन त्याचा ACK. NO. ३१९०१२६०००४८५२ व ३१९०१२६००१०२९१ असे आहे. सदर तक्रार पुढील चौकशी कामी पोलीस ठाणे सायबर येथे प्राप्त झाली होती. तक्रारदार यांची त्यांच्या आयडीएफसी फस्र्ट बँक शाखा, गजानन मंदीर, गारखेडा परिसर, औरंगाबाद येथून खाते क्र. १०२५५३७८००१ तसेच दूसरे खाते असलेले रत्नाकर बँक लिमिटेड शाखा सिडको, जालना रोड, औरंगाबाद येथील खाते क्र.३०९००००२८८४८ यावरुन एकुन रक्कम १६,९८,५००/–, २,१८,०००/– ची आर्थिक फसवणुक झाल्याचे सदर तक्रार दिली होती. तसेच NCCRP पोर्टल द्वारे अर्जदार यांची फसवणुक झालेली एकुण रक्कम रुपये पैकी Rs.४८,३९१.३५/– व ६६,४२१.४७/– विविध

बँक खात्यावर गोठवण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

०६. आरोपीच्या खात्यामध्ये खालीप्रमाणे रक्कम गोठवण्यात आल्याचे पोलीसांच्या म्हणण्यामध्ये दिसून येत आहे.

| Sr.No. | Bank Name | Account No. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | ICICI Bank. | 534611873791 | 24,349/- |
| 2 | ICICI Bank. | 004801641701 | 2,000/- |
| 3 | Bank of Baroda | 33738100022660 | 1,001.35/- |
| 4 | Karur Vysya Bank | 1197135000014360 | 1,696/- |
| 5 | HDFC Bank | 57500000568820 | 980/- |
| 6 | Central Bank of India | 00000005336818305 | 4,720/- |
| 7 | Karur Vysya Bank | 1975010000000114 | 3,341.51/- |
| 8 | Indian Bank | 621450046 | 62.49/- |
| 9 | HDFC Bank | 50200027864076 | 10,239.26/- |
| 10 | Union Bank of India | 522702010012201 | 1.74/- |

वरील रक्कम तक्रार क्र.३११९०१२६०००४८५२ या गुन्ह्यामध्ये गोठवण्यात आली आहेत.

| Sr.No. | Bank Name | Account No. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Bank of India | 831010510007344 | 1,000/- |
| 2 | State Bank of India | 32096380050 | 214.65/- |
| 3 | State Bank of India | 35253205614 | 664.04/- |
| 4 | Punjab National Bank | 0794000101213657 | 9,885.10/- |
| 5 | Punjab National Bank | 3982000100594120 | 1017/- |
| 5 | Airtel Payments Bank | 9086051657 | 714.90/- |
| 6 | Airtel Payments Bank | 8130172925 | 500/- |
| 7 | Bandhan Bank | 50190025444011 | 196.78/- |
| 8 | State Bank of India | 30298375668 | 1,400/- |
| 9 | State Bank of India | 00000030298375668 | 829/- |
| 10 | Kerala Gramin Bank | 40545111000195 | 50,000/- |

तसेच, वरील रक्कम तक्रार क्र. ३११९०१२६००१०२९१या गुन्ह्यामध्ये गोठवण्यात आली.

७. सदर पोर्टलवर तक्रारदार यांची एकूण रक्कम १,१४,८१२.८२/- रु. ही वरील बँकेच्या खातेवर होल्ड करण्यात आलेली आहे. तरी संबंधित तक्रारदार प्रदिप राजाराम सुरवसे यांची

ऑनलाईन आर्थीक फसवणूक झालेली रक्कम ही तक्रारदार यांचे अकाउंट नंबर वर वटतील अशा अटी व शर्तीसह आमची काही एक हरकत नाही. अर्जदाराच्या खात्यावर परत करण्यास न्यायालयास योग्य तसेच विद्वान सरकारी वकीलांनी रक्कम योग्य त्या अटी व शर्तीवर परत करण्याची विनंती केली आहे. प्रस्तुतची फिर्याद अर्जदारानेच दिलेली आहे. सदर मुद्देमालाचे स्वरुप पाहता ती रोख रक्कम असुन ती संबंधित बॅंकेने होल्ड आहे. अर्जदार यांच्या खात्यातुन सदर रक्कम हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे अर्जदारावर योग्य त्या अटी व शर्ती लादून जर सदरची रक्कम सुपूर्तनामा बंधपत्रावर परत दिली तर ते न्यायाच्या हितार्थ होईल आणि म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

(१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) जवाहरनगर पोलिस ठाणे, सायबर क्राइम, औरंगाबाद यांच्याकडे दाखल NCCRP पोर्टलद्वारे ACK. NO. ३१९०१२६०००४८५२ मधील रक्कम रुपये ४८,३९१.३५/– ही रक्कम

| Sr.No. | Bank Name | Account No. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | ICICI Bank. | 534611873791 | 24,349/- |
| 2 | ICICI Bank. | 004801641701 | 2,000/- |
| 3 | Bank of Baroda | 33738100022660 | 1,001.35/- |
| 4 | Karur Vysya Bank | 1197135000014360 | 1,696/- |
| 5 | HDFC Bank | 57500000568820 | 980/- |
| 6 | Central Bank of India | 00000005336818305 | 4,720/- |
| 7 | Karur Vysya Bank | 1975010000000114 | 3,341.51/- |
| 8 | Indian Bank | 621450046 | 62.49/- |
| 9 | HDFC Bank | 50200027864076 | 10,239.26/- |
| 10 | Union Bank of India | 522702010012201 | 1.74/- |

वरील खातेवर होल्ड करण्यात आलेली आहे. सदर रक्कम रुपये ४८,३९१.३५/– रुपये अर्जदारास IDFC First Bank, गारखेडा परीसर, औरंगाबाद अकाउंट नंबर १०२५५३७८००१ शाखा सेव्हन हिल औरंगाबाद यावर रक्कम रुपये ४८,३९१.३५/– सुपूर्तनामा बंधपत्र दिल्यानंतर त्यास परत करण्यात यावी.

(३) जवाहरनगर पोलिस ठाणे, सायबर क्राइम, औरंगाबाद यांच्याकडे दाखल NCCRP पोर्टलद्वारे ACK. NO. ३११९०१२६००१०२९१ मधील रक्कम रुपये ६६,४२१.४७/– ही रक्कम

| Sr.No. | Bank Name | Account No. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Bank of India | 831010510007344 | 1,000/- |
| 2 | State Bank of India | 32096380050 | 214.65/- |
| 3 | State Bank of India | 35253205614 | 664.04/- |
| 4 | Punjab National Bank | 0794000101213657 | 9,885.10/- |
| 5 | Punjab National Bank | 3982000100594120 | 1017/- |
| 5 | Airtel Payments Bank | 9086051657 | 714.90/- |
| 6 | Airtel Payments Bank | 8130172925 | 500/- |
| 7 | Bandhan Bank | 50190025444011 | 196.78/- |
| 8 | State Bank of India | 30298375668 | 1,400/- |
| 9 | State Bank of India | 00000030298375668 | 829/- |
| 10 | Kerala Gramin Bank | 40545111000195 | 50,000/- |

वरील खातेवर होल्ड करण्यात आलेली आहे. सदर रक्कम रुपये ६६,४२१.४७/– रुपये अर्जदारास IDFC First Bank, गारखेडा परीसर, औरंगाबाद अकाउंट नंबर १०२५५३७८००१ यावर रक्कम रुपये ६६,४२१.४७/– सुपूर्तनामा बंधपत्र दिल्यानंतर त्यास परत करण्यात यावी.

(४) ज्यावेळेस मुद्देमाल हजर ठेवण्याचे आदेश करण्यात येतील त्यावेळेस अर्जदाराने विनाविलंब तो न्यायालयात हजर करावा.

(५) सदर आदेशाची प्रत, सुपूर्तनामा व छायाचित्रे या गुन्हयाच्या कागदपत्रांमध्ये अथवा दोषारोपपत्र दाखल झाले असल्यास त्यामध्ये जतन करुन ठेवण्यात यावीत.

PRACHI RADHAKISAN PALWE

Digitally signed by PRACHI RADHAKISAN PALWE
Date: 2026.03.17 10:31:10 +0530

दिनांक : १६/०१/२०२६

ठीकाण– औरंगाबाद

(पी. आर.पालवे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. १२), औरंगाबाद.